# प्रताप महाविद्यालय (स्वायत्त), अमळनेर जि. जळगाव

## शै.वर्ष -२०२३ -२०२४

## राष्ट्रीय सेवा योजना

विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर

## अहवाल

## दि. १० फेब्रुवारी २०२४ ते १६ फेब्रुवारी २०२४

चिमणपुरी पिंपळे ता. अमळनेर, जि. जळगाव

**कार्यक्रम अधिकारी**
**प्रा डॉ हेमंत. जी. पवार**

**प्राचार्य,**
**प्रा. डॉ .ए. बी. जैन**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व प्रताप महाविद्यालय (स्वायत्त),अमळनेर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर चिमणपुरी पिंपळे ता. अमळनेर येथे **१० /०२ /२०२४ ते १६ /०२ /२०२४** दरम्यान आयोजित करण्यात आले

**दि. १० फेब्रुवारी** रोजी प्रताप महाविद्यालय (स्वायत्त) अमळनेरच्या राष्ट्रीय सेवा योजना एकक व कबचौ उमवी जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आज दत्तक चिमणपुरी पिंपळे येथे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीराचे उद्धाटन करण्यात आले. या कार्यक्रमा प्रसंगी प्राचार्य डॉ. ए. बी. जैन अध्यक्ष तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी सैनिक आसाराम पंडित पाटील, दत्त संस्था चिमणपुरी चे अध्यक्ष निंबा दला चौधरी आणि कबचौ उमवी जळगाव चे अधीसभा सदस्य प्रा. डॉ. एस. बी. नेरकर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे उद्धाटन माजी सैनिक आसाराम पंडित पाटील यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या प्रतिमेला माल्यार्पण करून केले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. हेमंत पवार यांनी पुढील सात दिवसात श्रमसंस्कार शिबिराचे नियोजन प्रस्तुत केले.

‘ सक्षम युवा समर्थ भारत’ या संकल्पनेवर आधारित या शिबिराच्या उद्धाटनप्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. ए. बी. जैन यांनी सर्व युवकांनी अनेक कौशल्य आत्मसात करून एक सक्षम युवा बनण्याचे आवाहन केले. तसेच असे कौशल्य प्राप्त युवा सक्षम भारत निर्माण करतील असे प्रतिपादन केले आणि शिबिराला शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. भाग्यश्री जाधव यांनी केले. तर आभार प्रदर्शन प्रा. सुनील राजपूत यांनी केले. या याप्रसंगी सरपंच वर्षाताई युवराज पाटील, गोकुळ चुडामन पाटील, संतोष बापू चौधरी, भगवान शंकर पाटील, रामकृष्ण साहेबराव पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाला उमवि रासेयो संचालक प्रा.डॉ.सचिन नांद्रे,जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. दिनेश पाटील , विभागीय समन्वयक प्रा.डॉ.दिलीप गिर्हे यांनी प्रेरणा दिली. या कार्यक्रमाला अश्विनी पाटील, कल्याणी चौधरी, मानसी चौधरी, जागृती चौधरी, गुरुदास कोळी, शुभंम पाटील , कौशल भावसार, राहुल गोसावी व सर्व स्वयंसेवकांनी मेहेनत घेतली.

दि.१० /०२ /२०२४ रोजी सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींसह चिमणपुरी पिंपळे येथे सायंकाळी पोहचलो. शिबीराचे ठिकाण दत्त मंदिर सभागृह येथे साफसफाई केली व राहण्याची सोय केली.

प्रथम दिनी दि.१० /०२ /२०२४ रोजी सकाळी ११ .३० वाजता माजी सैनिक आसाराम पंडित पाटील यांच्या हस्ते उद्घाटन झाले. हा कार्यक्रम झाल्यानंतर राष्ट्रीय सेवा योजना गीत व प्रेरणागीते घेण्यात आली. सात दिवसीय निवासी शिबीरादरम्यान, मतदान जनजागृती पथनाट्य, बालविवाह , रक्तदान व अवयव दान महत्व, प्लॅस्टिक मुक्त भारत, साक्षरता, दारूबंदी, पर्यावरण, ग्लोबल वार्मिंग (जागतिक तापमानवाढ), हुंडाबळी, एडस, व्यसनमुक्ती, स्त्रीभ्रूण हत्या, मुलींची घटती संख्या, इंडिया मधून भारत निर्माण करणे इ. विषयांवर सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

सात दिवसीय शिबीरात विविध मान्यवरांचे बौद्धिक सत्रात व्याख्याने आयोजित केली. सात दिवसीय निवासी शिबीरात कार्यक्रम पत्रिकेनुसार कार्यक्रम व उपक्रम राबविले. यामध्ये डॉ. धनंजय चौधरी यांनी राष्ट्रीय सेवा योजना गीत तसेच प्रेरणा गीत या विषयावर मार्गदर्शन केले. प्रा. अवित पाटील यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्व पटवून दिले. तसेच प्रा. योगेश पाटील यांनी ग्रामीण विकासावर मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. विजय तुंटे यांनी स्पर्धा परीक्षा व तनाव मुक्त युवक या विषयावर व्याख्यान दिले. प्रा. डॉ. हेमंत पवार यांनी 'युवा पोर्टल माय भारत' या विषयी गावातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच शिबिरातील सर्व विद्यार्थ्यांचे नाव नोंदवून घेतले.

दिनांक १२ फेब्रुवारी रोजी **मतदार जनजागृती अभियान** राबविण्यात आले. यासाठी मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी मा. महादेव खेडकर यांच्या सहकार्याने गावातील ग्रामस्थाना ई. वी. एम. मशीन,

बॅलेट यूनिट, व्ही. व्हि. प्याट प्रत्यक्ष दाखवून मतदान कश्या प्रकारे केले जाते ही प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आले. तसेच सायंकाळी गावात फेरी काढून मतदार जनजागृती करण्यात आली. यावेळी स्वयंसेवकानी मतदार जनजागृती वर पथनाट्य केले. डॉ मिलिंद नवसारीकर (लायन्स क्लब अमळनेर) यांनी **आरोग्य तपासणी शिबीर** घेतले यात विशेषता अवयव दान जनजागृती करण्यात आली. तसेच डॉ. विशाल जोशी यांनी स्वयंसेवकांचे **दंत तपासणी शिबिर** घेतले. प्रा. डॉ. धिरज वैष्णव यांनी 'पंचपप्रण' बद्दल उपस्थिताना मार्गदर्शन केले. तसेच प्रा. डॉ. विजय मांटे यांनी 'इंडिया मधून भारत निर्माण करणे' यावर व्याख्यान दिले. दत्त मंदिर, मराठी शाळा तसेच गावात प्लॅस्टिक मुक्त अभियान राबविण्यात आले. या अभियानाला डॉ. नीलेश पवार यांनी मार्गदर्शन केले आणि शिबीरार्थी स्वयंसेवकांनी गावातील प्लॅस्टिक कचरा जमा केला. प्रा.एल एल मोमाया – 'आजचे युवक आणि शिक्षण पद्धती' , प्रा.डॉ.जयंत पटवर्धन 'ग्राम विकास' (प्रताप महाविद्यालय, अमळनेर) – , प्रा.लिलाधर पाटील (धनदाई महाविद्यालय, अमळनेर) 'युवक आणि वाचन संस्कृति , प्रा. डॉ नलिनी पाटील, प्रा. डॉ. कल्पना पाटील इ. मान्यवरांनी शिबीरार्थी स्वयंसेवकांचे व ग्रामस्थांचे प्रबोधन व मार्गदर्शन केले. या शिबिराला डॉ. सचीनजी नांन्द्रे, रासेयो संचालक व प्रा. डॉ दिलीप गिर्हे, विभागीय समन्वयक कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव यांनी भेट देवून मार्गदर्शन केले. तसेच प्रा. डॉ. दिनेश पाटील जिल्हा समन्वयक यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. राज्यशासन, केंद्रशासन व कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या समन्वयकाच्या मार्गदर्शनाने सक्षम युवा समर्थ भारत विषयाला मध्यवर्ती ठेऊन हिवाळी शिबीर संपन्न झाले.

शिबिरा दरम्यान गावा जवळील टेकडीवर श्रम दान करण्यात आले सकाळी ७ ते ११ च्या दरम्यान गावाच्या नैऋत्य कडील टेकडीवर वृक्ष रोपणसाठी खड्डे खोदण्यात आले.

दुपारच्या बौद्धिक सत्रानंतर सायंकाळी मैदानी खेळ घेण्यात आले व भोजनानंतर रात्री ८ ते ९.३० दरम्यान गावकऱ्यांसाठी सांस्कृतिक कार्यक्रमात अप्रतिम कलाकृती सादर करण्यात आले यांस सरपंच, उपसरपंच व लहान मुलांसह गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित राहत.

चिमणपुरी पिंपळे गावामध्ये स्वयंसेवकांनी सर्वेक्षण केले. चिमणपुरी पिंपळे गावातील घरांची एकूण संख्या ४ ०० असून चिमणपुरी पिंपळे गावाचे विविधांगी सर्वेक्षण करण्यात आले. शैक्षणिक दृष्ट्या ही गाव पुढारलेले असून या गावातील ७५ टक्के मुली या पदवीचे शिक्षण घेत आहेत. तसेच बऱ्याच युवकांचे मतदार नावनोंदणी बाकी असून त्यांना नावनोंदणी करण्याचे मार्गदर्शन केले.

**१६ फेब्रुवारी २०२४** चिमणपुरी पिंपळे गावात प्रताप महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष हिवाळी शिबिराचा समारोप झाला या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. बी. जैन तर प्रमुख अतिथी खांदेश शिक्षण मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ अनिल शिंदे , दत्त मंदिर प्रतिष्ठान चे अध्यक्ष श्री. निंबा दला चौधरी, मा युवराज पाटील , मा संतोष चौधरी हे होते. महात्मा गांधींच्या प्रतिमेचे पूजनानंतर कार्यक्रम अधिकारी प्रा डॉ. हेमंत पवार यांनी ७ दिवसांमध्ये वृक्षा रोपणसाठी १०० खड्डे , युवा भारत पोर्टल नोंदणी, पंचप्रण, मतदार जनजागृती अभियान व पथनाट्य, अवयव दान व दंत चिकित्सा शिबिर , सर्वेक्षण, ग्रामस्वच्छता इतर केलेल्या कामांविषयीचे अहवाल वाचन केले. मनीषा पाटील , मोनिका पाटील , दीपक पाटील या स्वयंसेवकांनी मनोगतातून सात दिवसात झालेला सकारात्मक बदल प्रकट केला. अतिथी मनोगतातून मा. युवराज पाटील यांनी स्वयंसेवकांनी गावात केलेल्या कामाची स्तुती करून महाविद्यालयाचे आभार मानले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. ए. बी जैन यांनी गावात केलेल्या विविध कामांसाठी स्वयंसेवकांचे अभिनंदन केले. सक्षम युवा निर्माण झाल्यास समर्थ भारत निर्माण होईल असे प्रतिपादित केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा भाग्यश्री जाधव तर आभार प्रदर्शन अश्विनी पाटील यांनी केले

संपूर्ण शिवीर यशस्वी होण्यासाठी खानदेश शिक्षण मंडळाचे सर्व पदाधिकारी, प्रताप महाविद्यालयाचे प्राचार्य उपप्राचार्य, प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी, वसतीगृह प्रमुख, विद्यार्थी व विद्यार्थीनींचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच खा.शि.मंडळाचे चिटणीस व प्राचार्य प्रा.डॉ.ए.बी.जैन, सर्व उपप्राचार्य यांनीही मौलिक सहकार्य केले. कबचौ-उमवि जळगाव सीनेट सदस्य प्रा.डॉ.संदीप नेरकर, राष्ट्रीय सेवा योजनेतील सत्लागार समितीचे सदस्य, प्रा. डॉ व्ही.बी.माटे तसेच विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.डॉ.तुषार रजाळे व कबचौ-उमवि-रासेयोचे विभागीय समन्वयक मा.प्रा.डॉ.दिलीप गिर्हे ,जिल्हा समनव्यक प्रा डॉ दिनेश पाटील व रासेयो संचालक मा सचिन नांद्रे यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. राष्ट्रीय सेवा योजनेचे माजी स्वयंसेवकांचे सहकार्य लाभले. त्याबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार.

धन्यवाद,

आपले विश्वासू,

रासेयो **कार्यक्रम अधिकारी**
**प्रा डॉ हेमंत. जी. पवार**

**प्राचार्य,**
**प्रा. डॉ .ए. बी. जैन**